**NKT/KS/17/1012**

**Bachelor of Arts (B.A.) Part—II Examination**

**MARATHI (Old)**

**(Compulsory)**

**(Other Language)**

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 100

1. पुढीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर पाठ्यपुस्तकाच्या आधारे निबंध लिहा : 20

   (1) पंचविशीची थोरवी

   (2) सामाजिक लोकशाहीचे महत्व

   (3) दलित वाङ्मयाची चळवळ

   (4) सावित्रीबाई फुले :- व्यक्ती व कार्य.

2. कार्ल मार्क्सच्या स्वत:वरील प्रभावाचे चित्रण सुर्वे यांनी 'कार्ल मार्क्स' या कवितेतून कसे केले आहे. 20

**किंवा**

'वावर' या कवितेचे रसग्रहण करा.

3. पुढीलपैकी कोणत्याही **एकाच** गटातील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे शंभर शब्दांत लिहा : 20

**गट 'अ'**

(क) 'दिव्याभोवती पतंग उडत आहे' या नाट्यछटेचे आशयसौंदर्य स्पष्ट करा.

(ख) 'विज्ञानाची उपासना कोणत्याही स्वतंत्र स्वाभिमानी राष्ट्राला यापुढे टाळता येणार नाही,' असे लेखक का म्हणतात ?

(ग) ध्येयवादी विभूतींविषयी समाजाची भावना कशी असते, ते स्पष्ट करा.

(घ) 'प्रत्येक महत्कार्याच्या मुळाशी ऐन पंचविशींतली बेफिकीरीच असते', असे लेखक का म्हणतात ?

**किंवा**

**गट 'आ'**

(च) 'दलित साहित्य माणासाला केंद्र करते, माणसाला महान मानते' या विधानाची चर्चा करा.

(छ) 'टवाळ टाळी' चे स्वरूप स्पष्ट करा.

(ज) 'गोरीला' पाठाचा आशय थोडक्यात स्पष्ट करा.

(झ) अरूण लिमये यांचा बांगला देशातील अनुभव वर्णन करा.

4. खालीलपैकी कोणत्याही **एकाच** गटातील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे शंभर शब्दांत लिहा : 20

**गट 'क'**

(त) 'बोरबन' कथेतील राघो-मैनाचे थोडक्यात वर्णन करा.

(थ) संत तुकारामांनी दांभिकतेची व्यर्थता कशी पटवून दिली आहे.

(द) कार्यालयीन पत्र म्हणजे काय ? कार्यालयीन पत्राचे घटक सांगा.

(ध) संस्थेच्या इमारतीची कोणशीला बसविण्याच्या समारंभाची निमंत्रण पत्रिका तयार करा.

**किंवा**

**गट 'ख'**

(प) 'जातीप्रेम लोकशाहीला मारक आहे' असे लेखक का म्हणतात ?

(फ) 'पारवा' कवितेतील कवी मनाची वेदना स्पष्ट करा.

(ब) टिप्पणी लेखनाचा हेतू सांगून माहितीपर टिप्पणीचे स्वरूप स्पष्ट करा.

(भ) इतिवृत्त लेखनाच्या पद्धतीचे स्वरूप सांगा.

5. पुढील **सर्व** प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा : 20

(1) 'यूध्य-समइं स्त्री-अळंकार-स्वीकारू' या लिळेतील घटनेचे वर्णन करा.

(2) 'गुलाम' कवितेचा थोडक्यात आशय स्पष्ट करा.

(3) अहवालात्मक इतिवृत्ताचे स्वरूप स्पष्ट करा.

(4) मथळ्यांचे प्रकार थोडक्यात सांगा.